# रामनारायण रूईया महाविद्यालय

## मराठी विभाग

दिनांक : २७ जुलै, २०१७.

मराठी विषय अभ्यासक्रम समिती बैठक

★ अजेंडा आणि चर्चा

मराठी विभागातर्फे स्वायत्त रामनारायण रूईया महाविद्यालयाच्या मराठी विषयाच्या अभ्यासक्रम समितीची बैठक गुरुवार, दिनांक २७ जुलै २०१७ रोजी प्राध्यापक कक्ष, दुसरा मजला, रामनारायण रूईया महाविद्यालय येथे दुपारी ३ वाजता आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस मराठी विषय अभ्यासक्रम समितीचे सर्व सदस्य उपस्थित होते. या बैठकीत रामनारायण रूईया महाविद्यालयातील प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्ष मराठीच्या अभ्यासक्रमावर चर्चा झाली. बैठकीत चर्चेला आलेले मुद्दे पुढीलप्रमाणे –

- उपस्थित सर्वच सभासदांनी स्वायत्ततेचे स्वागत केले. स्वायत्ततेमुळे मिळणारे शैक्षणिक स्वातंत्र्य अधिक चांगल्यारितीने पुढील काळात कसे अंमलात आणता येईल याबद्दल अनेक स्वागतार्ह सूचना केल्या.
- या सूचनांवर साधकबाधक चर्चा होऊन त्यांचा अंतर्भाव अभ्यासक्रमात टप्प्याटप्प्याने केला जाईल असा निर्वाळा मराठी विभागाने दिला.
- प्रथम वर्ष अनिवार्य मराठी मधील वर्तमानपत्रासाठी जाहिरातलेखन या शब्दप्रयोगाऐवजी छापील माध्यमासाठी जाहिरातलेखन असा बदल करण्याची सूचना करण्यात आली आणि ती सर्वानुमते मान्य करण्यात आली.
- प्रथम वर्ष कला शाखेच्या ऐच्छिक मराठी या विषयाच्या प्रस्तावित अभ्यासक्रमात घेतलेले 'प्रेमा तुझा रंग कसा?' हे नाटक शिकविण्याऐवजी समितीने अन्य काही नाटकांचे पर्याय सुचविले आहेत. त्यातून एका नाटकाची निवड करून समितीला ई – पत्राद्वारे कळविण्यात यावे असा निर्णय झाला.
- प्रथम वर्ष कला शाखेच्या ऐच्छिक मराठी या विषयाच्या प्रस्तावित अभ्यासक्रमात नेमलेल्या कवितांमध्येसुद्धा समितीने काही बदल सुचविले आहेत. त्याप्रमाणे

Scanned with CamScanner

अभ्यासक्रमात बदल करण्यात येतील आणि समितीला ई – पत्राद्वारे कळविण्यात येतील असा निर्णय झाला.

- मुंबई विद्यापीठाने द्वितीय वर्ष कला मराठीचा अभ्यासक्रम नुकताच बदलला असून तो समितीला स्वागतार्ह वाटला. त्यामुळे तो बदल न करता शिकविण्याचे निश्चित झाले.
- तृतीय वर्ष कला शाखा मराठीच्या अभ्यासपत्रिका क्र. ९ मध्ये ग्रंथ परीक्षणासाठी चार कादंबऱ्यांऐवजी दोनच कादंबऱ्या नेमाव्यात आणि त्यासोबत एक नाट्यकृती आणि एक चित्रपट यांचे परीक्षण सैद्धांतिक भागासह शिकविण्यात यावे असे ठरले.

वरील मुद्द्यांवर चर्चा होऊन सोबत जोडलेला अभ्यासक्रम एकमताने मान्य करण्यात आला.

उपस्थिती

अभ्यासक्रम समिती सदस्य:

प्रा. लीना केदारे (प्रमुख, मराठी विभाग, रामनारायण रूईया महाविद्यालय)

डॉ. भारती निरगुडकर (प्रमुख, मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ)

प्रा. शिल्पा नेवे (सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग, रामनारायण रूईया महाविद्यालय)

डॉ. अनिल सपकाळ (विषयतज्ज्ञ)

डॉ. प्रज्ञा दया पवार (विषयतज्ज्ञ)

डॉ. कैलास जोशी (विषयतज्ज्ञ)

श्री. संजय पवार (व्यावसायिक तज्ज्ञ)

श्री. राजीव खांडेकर (व्यावसायिक तज्ज्ञ) 27/7/17

अधिश्री पाटील (विद्यार्थी प्रतिनिधी, तृतीय वर्ष मराठी)

नुपुर कुलकर्णी (विद्यार्थी प्रतिनिधी, द्वितीय वर्ष मराठी)

Scanned with CamScanner

# रामनारायण रूईया स्वायत्त महाविद्यालय
## मराठी विभाग

**दिनांक : ५ मार्च, २०१८.**

**मराठी विषय अभ्यासक्रम समिती बैठक**

* अजेंडा आणि चर्चा

मराठी विभागातर्फे स्वायत्त रामनारायण रूईया स्वायत्त महाविद्यालयाच्या मराठी विषयाच्या अभ्यासक्रम समितीची बैठक सोमवार, दिनांक ०५ मार्च २०१८ रोजी प्राध्यापक कक्ष, दुसरा मजला, रामनारायण रूईया महाविद्यालय येथे सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस मराठी विषय अभ्यासक्रम समितीचे सदस्य उपस्थित होते. या बैठकीत रामनारायण रूईया महाविद्यालयातील प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्ष मराठीच्या अभ्यासक्रमावर चर्चा झाली. बैठकीत चर्चेला आलेले मुद्दे पुढीलप्रमाणे –

- उपस्थित सर्व सभासदांचे विभागप्रमुखांनी स्वागत केले आणि सभेपुढे बैठकीमागील उद्देश मांडून चर्चेला सुरुवात केली.
- प्रा. डॉ. अनिल सपकाळ यांचे विभागप्रमुख झाल्याबद्दल अभिनंदन करण्यात आले आणि डॉ. भारती निरगुडकर विभागप्रमुखपदी नसल्यामुळे विषयतज्ज्ञ म्हणून सदर बैठकीत सहभागी झाल्या.
- अभ्यास समितीला प्रश्नपत्रिका नियमानुसार करण्यात आलेल्या आहेत हे पाहण्यासाठी प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष कला शाखेच्या अनुक्रमे सत्र १, ३, ५ च्या मराठी विषयाच्या सर्व प्रश्नपत्रिका अभ्यास समितीपुढे सादर करण्यात आल्या आणि उपस्थित सर्व सदस्यांनी त्या नियमानुसार असल्याचा निर्वाळा दिला. त्यात डॉ. भारती निरगुडकर यांनी तृतीय वर्ष कला शाखेच्या अभ्यासपत्रिका क्र. ६ साठी मुद्रितशोधनाचा उतारा उत्तरपत्रिकेसह स्वतंत्रपणे देण्यात यावा अशी सूचना केली.
- स्वायत्त महाविद्यालय म्हणून वर्षभर मराठी विभागाने मराठी विषयाचा जो नवीन अभ्यासक्रम राववला त्यासंदर्भातील विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया विषय शिक्षकांनी मांडल्या -

  विद्यार्थ्यांनी या नव्या अभ्यासक्रमाचे स्वागत केले असून प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना 'जांभूळ आख्यान' या लोककलात्मक वाजाच्या आगळ्या नाट्यकृतीमुळे लोकपरंपरेचेही भान निर्माण झाले. तृतीय वर्ष कलाशाखेच्या व्यवसायाभिमुख मराठी या विषयपत्रिके अंतर्गत ग्रंथपरीक्षणाच्या जोडीने नाट्य आणि चित्रपट परीक्षण केले जावे हा अभ्यासमंडळाने सुचवलेला बदल विद्यार्थ्यांना आवडला. त्यानिमित्ताने 'घाशीराम कोतवाल' आणि 'सैराट' या दोन कलाकृती दाखवून त्यावर तज्ज्ञांची व्याख्यानेही विभागाने आयोजित केली. या व्याख्यानांना विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद लाभला. सदर बदलाचे चांगले स्वागत तृतीय वर्ष कलाशाखेच्या विद्यार्थ्यांकडून करण्यात आले.
- स्वायत्ततेमुळे सर्व अभ्यासपत्रिकांसाठी देण्यात आलेल्या प्रकल्पांबद्दल प्रा. शिल्पा नेवे आणि अनघा पेंडसे यांनी त्यांचे निरीक्षण नोंदवले. प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष आणि तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी प्रकल्पांना खूपच सकारात्मक प्रतिसाद दिला. गट प्रकल्प तयार केले. मौखिक सादरीकरण घेण्यात

Scanned with CamScanner

आले. अनेक प्रकल्प खूपच कल्पक होते. प्रकल्प तयार करण्याची प्रक्रियाही विद्यार्थ्यांसाठी आनंददायी ठरली.

मात्र तृतीय वर्ष कलाशाखेच्या भारतीय आणि पाश्चात्त्य साहित्यशास्त्र, भाषाविज्ञान आणि मराठी व्याकरण या तात्त्विक विषयपत्रिकांना प्रकल्प विषय देतांना मर्यादा जाणवतात. त्यामुळे या दोन विषयांचा अपवाद करून इतर विषयांसाठी प्रकल्प दिले जावेत आणि या दोन विषयांसाठी ३० गुणांची अंतर्गत चाचणी परीक्षा घेण्यात यावी अशी विनंती प्रा. शिल्पा नेवे यांनी अभ्यासमंडळाला केली आणि ती त्यांनी मंजूर केली.

- तृतीय वर्ष कलाशाखेच्या व्यवसायाभिमुख मराठी या अभ्यासपत्रिकेच्या सत्र ६ च्या ग्रंथ – नाट्य – चित्रपट परीक्षणासाठी नव्या कलाकृती सुचविण्याची विनंती अभ्यासमंडळाला करण्यात आली. पुढील बैठकीच्या वेळेस नव्या कलाकृतींची नावे सुचविण्यात येतील असे सर्वांनी सांगितले.
- मुंबई विद्यापीठाच्या मराठी अभ्यासमंडळाची नियुक्ती अलिकडेच झालेली असून या अभ्यासमंडळाकडून नवीन अभ्यासक्रम येण्याची शक्यता आहे. ती गृहीत धरून नियमानुसार या अभ्यासक्रमाशी समकक्ष राहणारे बदल करण्याच्या दृष्टीने विद्यापीठाच्या अभ्यासक्रमाची वाट पाहणे आवश्यक आहे. त्यामुळे या बैठकीत अभ्यासक्रम बदलाबावतचे संपूर्ण निर्णय घेता आले नाहीत. हे निर्णय नंतर घेण्याचे ठरले.
- स्वायत्त महाविद्यालय झाल्यामुळे परीक्षेसंदर्भात अथवा इतरही काही वावींबावतीत महाविद्यालयात करण्यात येणाऱ्या सूचनांमुळे काही बदल विभागाला त्या – त्या वेळेस करावे लागतील. अशा बदलांसाठी या बैठकीत पूर्वसंमती दिली जावी, अशी विनंती विभागप्रमुख लीना केदारे यांनी केली आणि ती अभ्यासमंडळाने मंजूर केली.

उपस्थिती

**अभ्यासक्रम समिती सदस्य:**

**प्रा. लीना केदारे (प्रमुख, मराठी विभाग, रामनारायण रूईया महाविद्यालय)**

**प्रा. डॉ. अनिल सपकाळ (प्रमुख, मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ)**

**प्रा. शिल्पा नेवे (सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग, रामनारायण रूईया महाविद्यालय)**

**डॉ. भारती निरगुडकर (विषयतज्ज्ञ)**

**डॉ. प्रज्ञा दया पवार (विषयतज्ज्ञ)**

**डॉ. कैलास जोशी (विषयतज्ज्ञ)**

**श्री. संजय पवार (व्यावसायिक तज्ज्ञ)**

**श्री. राजीव खांडेकर (व्यावसायिक तज्ज्ञ)**

**अधिश्री पाटील (विद्यार्थी प्रतिनिधी, तृतीय वर्ष मराठी)**

**नुपुर कुलकर्णी (विद्यार्थी प्रतिनिधी, द्वितीय वर्ष मराठी)**

Scanned with CamScanner